अनूसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी ( वनहक्काची मान्यता ) अधिनियम २००६ व नियम २००८ व सुधारित नियम २०१२ च्या अंतर्गत सामुहिक वनह्क्काची अंमलबजावणी अंतर्गत सामुहिक वनहक्काची अंमलबजावणीसाठी १६ जिल्हयातील ९ जिल्हा व्यवस्थापक व ६१ तालुक्यांसाठी ५५ तालुका व्यवस्थापक तसेच आयुक्त, आदिवासी विकास,म.रा.नाशिक व अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नाशिक, ठाणे, अमरावती व नागपूर येथे प्रत्येकी १ या प्रमाणे ५ अशा एकूण ६९ व्यवस्थापकांच्या पदांना मुदतवाढ देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः आविवि-२०१७/ प्र.क्र.३४/का.८
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
तारीख: २७ ऑक्टोबर,२०१७

वाचा -

१) शासन निर्णय क्रमांकः आदिवासी विकास विभाग,शासन निर्णय क्र.राज्यपा-२०१६/प्र.क्र.१६/का-१६, दि.३ मार्च,२०१६.
२) शासन निर्णय क्रमांकः आदिवासी विकास विभाग,शासन निर्णय क्र.राज्यपा-२०१५/प्र.क्र.८६/का-१६, दि.३ मार्च,२०१६.
३) शासन निर्णय क्रमांकः आदिवासी विकास विभाग,शासन निर्णय क्र.आविवि-२०१६/प्र.क्र.७१/का-८, दि.१० ऑक्टोबर,२०१६.
४) आदिवासी विकास विभाग,शासन शुध्दीपत्रक क्र.आविवि-२०१६/प्र.क्र.७१/का-८, दि.२१ डिसेंबर, २०१६.
५) मा. राज्यपाल यांचे कार्यालयाचे पत्र क्रमांक : RB/DB/e-१३०१६/(१०)/(२०१६)/ PSMC-७th meeting/ Minutes /१७ Feb-२०१७/३०४, दि. १४ मार्च, २०१७ चे पत्र
६) आदिवासी विकास विभाग,शासन निर्णय क्र.आविवि-२०१७/प्र.क्र.३४/का-८, दि.०८ जून, २०१७.

**<u>प्रस्तावना -</u>**

मा.राज्यपाल यांच्या कार्यालयात केंद्र शासनाच्या आदिवासी विकास मंत्रालयाने दिलेल्या सुचनेस अनुसरुन आदिवासी कक्षाची स्थापना, सामान्य प्रशासन विभागाच्या दि. ३१.१.२०१२ च्या शासन निर्णयान्वये करण्यात आली. सदर आदिवासी कक्षामार्फत करावयाची कार्यवाही तसेच या कक्षामार्फत राबविण्यात येणाऱ्या पथदर्शी प्रकल्पाबाबत मार्गदर्शक तत्वे आदिवासी विकास विभागाच्या दि.५.३.२०१३ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आली असून मा. सचिव (आ.वि.) यांच्या अध्यक्षतेखाली पथदर्शी प्रकल्प मंजूरी व सनियंत्रण समिती गठीत केली आहे. सदर पथदर्शी प्रकल्प मंजूरी व सनियंत्रण समितीची ७ वी बैठक दि. १७ फेब्रुवारी,२०१७ रोजी आयोजित करण्यात आली. सदर बैठकीमध्ये अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वनहक्काची मान्यता) अधिनियम २००६ व नियम २००८ व सुधारित नियम २०१२ च्या अंतर्गत सामुहिक वनहक्काच्या अंमलबजावणीसाठी १६ जिल्हयातील ९ जिल्हा व्यवस्थापक व ६१ तालुक्यांसाठी ५५ तालुका व्यवस्थापकांच्या नेमणूकांना दि. १६ ऑगस्ट, २०१६ ते ३० जून, २०१७ पर्यंत मुदतवाढ देण्याकरिता संदर्भ क्र. ३ व ६ समोरील शासन निर्णयान्वये व संदर्भ क्र. ४ अन्वये शुध्दीपत्रक निर्गमित करण्यात आले आहे. आता सदरच्या एकूण ६९ व्यवस्थापकांच्या नेमणुका पुढील कालावधीसाठी म्हणजेच दि. १ जुलै, २०१७ ते दि. ३१ मार्च, २०१८ पर्यंत मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय-**

पथदर्शी प्रकल्प मंजूरी व सनियंत्रण समितीच्या दि. १७ फेब्रुवारी,२०१७ रोजी पार पडलेल्या ७ व्या बैठकीत घेतलेल्या निर्णयाप्रमाणे नाशिक, ठाणे, पालघर, रायगड, यवतमाळ चंद्रपूर या ६ जिल्हयातील ६ जिल्हा व्यवस्थापक व २२ तालुक्यातील २२ तालुका व्यवस्थापक आणि नंदूरबार, धुळे, जळगांव, अहमदनगर,पुणे,अमरावती, नांदेड, गोंदिया, नागपूर, पालघर, नाशिक, यवतमाळ या जिल्हयातील ३ जिल्हा व्यवस्थापक व ३९ तालुक्यासाठी ३३ तालुका व्यवस्थापक आणि आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य,नाशिक आणि अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग नाशिक,ठाणे अमरावती व नागपूर येथील प्रत्येकी १ व्यवस्थापक या प्रमाणे ५ असे एकूण ६९ व्यवस्थापकांच्या नेमणुकांची मुदतवाढ दिनांक ३० जून, २०१७ अखेर संपुष्टात आल्याने सदर व्यवस्थापकांच्या नेमणुकांस दि. १ जुलै, २०१७ ते दि. ३१ मार्च, २०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. या योजनेचे स्वरुप, व्यवस्थापकांची कर्तव्ये, भरती, निवडपध्दती इ. बाबतची कार्यपध्दती दिनांक ३ मार्च,२०१६ च्या शासन निर्णयामध्ये नमूद करण्यात आली आहे. सदरच्या नेमणुकांना दि. १ जुलै, २०१७ ते दि. ३१ मार्च, २०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यास तसेच त्यासाठी रु.१२८,५८,७५०/- ( अक्षरी रुपये एक कोटी अठ्ठाविस लाख अठ्ठावन हजार सातशे पन्नास ) इतकी तरतूद उपलब्ध करुन देण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे. सदर पदांसाठी अनुज्ञेय असलेला प्रोत्साहन भत्ता संबंधित जिल्हा / तालुका व्यवस्थापक यांनी पूर्ण केलेल्या प्रकरणांनुसार अदा करण्यात यावा.उपरोक्त ६९ व्यवस्थापकांपैकी जी पदे रिक्त आहेत, अशा पदांच्या मानधनावरील रक्कम शासनास वर्ष अखेरीस

प्रत्यार्पित करण्यात यावी. तसेच सर्व जिल्हा व्यवस्थापक / तालुका व्यवस्थापक यांनी दिलेल्या उद्दिष्टानुसार पूर्ण केलेली प्रकरणे व त्याअनुषंगाने त्यांना दिलेले मानधन व प्रोत्साहन भत्ता याची माहिती दर महिन्याला शासनास सादर करण्यात यावी.

अनूसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वनहक्काची मान्यता) अधिनियम २००६ व नियम २००८ व सुधारित नियम २०१२ च्या अंतर्गत सामुहिक वनहक्काच्या अंमलबजावणीसाठी १६ जिल्हयातील ९ जिल्हा व्यवस्थापक व ६१ तालुक्यांसाठी ५५ तालुका व्यवस्थापकांच्या नेमणूकांसाठी दि. १ जुलै,२०१७ ते दि. ३१ मार्च, २०१८ पर्यंत होणारा रुपये १२८,५८,७५०/- ( अक्षरी रुपये एक कोटी अठ्ठाविस लाख अठ्ठावन हजार सातशे पन्नास ) खर्च मागणी क्र.टी-५, २२२५- अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग व अल्पसंख्यांक यांचे कल्याण, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-०२, अनुसूचित जमातीचे कल्याण-७९६, जनजाती क्षेत्र उपयोजना (०१) जनजाती क्षेत्र उपयोजनांतर्गत योजना राज्य योजनांतर्गत योजना (०१) (५३) आदिवासी कक्षामार्फत राज्यातील अनुसूचित क्षेत्रामध्ये पथदर्शी प्रकल्पाची अंमलबजावणी (२२२५-डी-३६९)-३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) या लेखाशिर्षाखाली सन २०१७-१८ या आर्थिक वर्षातील मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या दि. १७ एप्रिल,२०१५ च्या परिपत्रकातील अटींची पुर्तता होत असल्याचे प्रमाणित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१०२७११३१५८५७२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Nitin Anant Pandharkame

Digitally signed by Nitin Anant Pandharkame
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=TDD Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f761a7f821e99980fa05dce802b53e7cac53a5d0939938606f9ffcbf374de146, serialNumber=daff58293cdb6a48448595bec6f720461af266f60ac506a258b41bd7bd95904d, cn=Nitin Anant Pandharkame
Date: 2017.10.27 15:37:40 +05'30'

**( नि.अ.पांढरकामे)**
अवर सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई-३५.
२. मा. मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई -३२.
३. महालेखापाल लेखापरिक्षा (लेखा व अनुज्ञेयता) ,महाराष्ट्र-१ मुंबई .

४. महालेखापाल लेखापरिक्षा (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर.
५. प्रधान सचिव, महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई.
६. प्रधान सचिव, महसूल व वन विभाग,(वने) मंत्रालय,मुंबई.
७. प्रधान सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय,मुंबई.
८. प्रधान मुख्य वन संरक्षक, (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य,नागपूर.
९. आयुक्त, आदिवासी विकास,नाशिक.
१०.जिल्हाधिकारी, नंदुरबार,धुळे,जळगांव,अहमदनगर,पुणे,अमरावती,नांदेड,गोंदिया,
११.नागपूर, पालघर, नाशिक,यवतमाळ, गडचिरोली व चंद्रपूर.
१२.मुख्य कार्यकारी अधिकारी,नंदुरबार, धुळे, जळगांव, अहमदनगर, पुणे,अमरावती, नांदेड, गोंदिया, नागपूर, पालघर, नाशिक,यवतमाळ, गडचिरोली व चंद्रपूर.
१३.अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे, नाशिक, अमरावती, नागपूर.
१४.तहसिलदार, नंदुरबार, धुळे, जळगांव, अहमदनगर, पुणे,अमरावती, नांदेड, गोंदिया, नागपूर, पालघर, नाशिक,यवतमाळ, गडचिरोली व चंद्रपूर.
१५.सहाय्यक आयुक्त (लेखा), आदिवासी विकास विभाग, नाशिक,ठाणे,अमरावती, नागपूर.
१६.प्रकल्प अधिकारी,एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नंदुरबार, धुळे, जळगांव, अहमदनगर, पुणे,अमरावती, नांदेड, गोंदिया, नागपूर, पालघर, नाशिक,यवतमाळ, गडचिरोली व चंद्रपूर.
१७.जिल्हा कोषागार अधिकारी, नंदुरबार, धुळे, जळगांव, अहमदनगर, पुणे,अमरावती, नांदेड, गोंदिया, नागपूर, पालघर, नाशिक,यवतमाळ, गडचिरोली व चंद्रपूर.
१८. सर्व उप सचिव/अवर सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१९. कक्ष अधिकारी (का-६), अर्थसंकल्प शाखा, आदिवासी विकास, मंत्रालय, मुंबई
२०. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
२१. निवड नस्ती (कार्यासन-८).